Chate
The Symbol of Merit

# चाटे कोचिंग क्लासेस

**मुख्य कार्यालय :** 'चाटे हाऊस' प्लॉट नं. ४, एन-२ क्रिकेट स्टेडियमजवळ, औरंगाबाद - ४३१ २१३ ☎ : २४७३००१/२

दिनांक :

प्रति,

डॉ. धनसिंग चौधरी,

संमोहन उपचार तज्ज्ञ पुणे.

**विषय : विद्यार्थ्यांसाठी संमोहन उपचार कार्यशाळा....**

महाशय,

आजचा विद्यार्थी हा पालकाचे भविष्य तर असतोच, पण त्यासोबत तो भारताचेही भविष्य असतो. याच विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी आमच्या चाटे कोचिंग क्लासेसच्या शाखांचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेला आहे. प्रत्येक ठिकाणी शाखा प्रमुख, शिक्षक, स्टाफ, शिपाई यांची निवड करतांना आम्ही खूप चांगले निकष लावतो. जास्तीत जास्त विद्यार्थी मेरिटमध्ये येण्यासाठी आमचा स्टाफ मेहनत घेण्यास कुठेही कमी पडत नाही. मात्र वाढत्या वयानुसार शरीरात होणाऱ्या संप्रेरकांचे स्त्रवण, त्यामुळे विद्यार्थांना विद्यार्थिनींविषयी, विद्यार्थिनींना विद्यार्थ्यांविषयी वाटणारे शरिरीक आकर्षण, त्यात आगीत तेल ओतणाऱ्या टिव्हीवरील अश्लिल जाहिराती, अश्लिल चित्रपट, नेटवर उपलब्ध असणाऱ्या फालतू वेबसाईट्स, चुकीची मैत्री, चुकीच्या सवई, व्यसनं,... चांगल्या घरचे विद्यार्थी / विद्यार्थिनीसुध्दा प्रेमाच्या नावाखाली या अशा गोष्टींकडे आकर्षित होतात. हुशार असूनही बुध्दीचा / क्षमतांच्या योग्य दिशेने वापर न झाल्यामुळे असे विद्यार्थी अभ्यासात मागे पडतात, अपयशी ठरतात, पालकांची निराशा होते.

डॉ.चौधरी, आपला **'कामयाबी की ओर'** हा स्टेज शो औरंगाबाद येथे पाहिल्यावर लक्षात आले की, अशा भरकटलेल्या विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवण्यासाठी व चांगले विद्यार्थी भरकटू नयेत म्हणून आपली संमोहन उपचारांची कार्याशाळा लाभदायी ठरू शकते. सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर २०० विद्यार्थ्यांसाठी औरंगाबाद मध्ये आम्ही आपल्या कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यशाळेनंतर विद्यार्थ्यांनामध्ये घडलेले सकारात्मक बदल विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या व आमच्याही लक्षात आले. त्यानंतर मात्र संपूर्ण महाराष्ट्रभर बऱ्याच शाखांवर विद्यार्थ्यांसाठी आपल्या कार्याशाळेचे आयोजन केले गेले. सर्वांच्याच सकारात्मक प्रतिक्रिया येत गेल्या. अजूनही गरजेनुसार आम्ही आमच्या विद्यार्थ्यांसाठी आपल्या कार्यशाळेचे आयोजन करत असतो व आपण आम्हास सहकार्य करता याबद्दल धन्यवाद!

आपला

Chate

CHATE COACHING CLASSES PVT.LTD,
"Chate House", Plot No.04,
Near Cricket Stadium,N-2,CIDCO,A'bad